दूरध्वनी (थेट) (0240) -2342096,
का. 2342097, फॅक्स 2332426
E-mail-edgmidc.abadwrd@maharashtra.gov.in

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ
"सिंचन भवन", जालना रोड, औरंगाबाद-431 005
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

# वार्षिकअहवाल

## 2018-2019

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| 1) | नियामक मंडळ | 2 |
| 2) | प्रास्ताविक | 3 |
| 3) | महामंडळाकडील कामाची व्याप्ती | 3 |
| 4) | महामंडळाचे कार्यक्षेत्र | 4 |
| 5) | मत्ता व दायित्वे | 4 |
| 6) | सन 2018-2019 मधील कामांची स्थिती | 4 |
| 7) | सिंचन क्षमता निर्मिती. | 4 |
| 8) | सन 2018-2019 मधील निधीची उभारणी तपशील | 4 |
| 9) | लेखे | 5 |
| 10) | महामंडळ स्थापनेनंतर केलेली उल्लेखनीय कामे | 6 ते 12 |
| 11) | दिनांक 31-03-2019 अखेर ताळेबंद | 13 ते 20 |
| | अ. स्वतंत्र लेखापरिक्षण अहवाल | 21 व 22 |
| | ब. लेखापध्दतीत वापरलेली लेखा तत्वे व त्यावरील सूचना | 23 ते 25 |

दूरध्वनी (थेट) (0240) -2342096,
का. 2342097, फॅक्स 2332426
E-mail-
edgmidc.abadwrd@maharashtra.gov.in

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ

"सिंचन भवन", जालना रोड, औरंगाबाद-431 005

# नियामक मंडळ
# वर्ष 2018-2019

| अ.क्र. | पदाधिकाऱ्याचेनांव | पदनाम | कालावधी |
|---|---|---|---|
| 1 | मा. ना. श्री. गिरीष महाजन | मंत्री (जसं)व पदसिध्द अध्यक्ष गो.म.पा.वि.म.औरंगाबाद | 01-4-2018 ते 31-03-2019 |
| 2 | मा.ना.श्री. विजय शिवतारे | राज्यमंत्री (जसं)व पदसिध्द उपाध्यक्ष | 01-4-2018 ते 31-03-2019 |
| 3 | मुख्यसचिव | पदसिध्द उपाध्यक्ष | 01-4-2018 ते 31-03-2019 |
| 4 | प्रधानसचिव (वित्त) | पदसिध्द सदस्य | 01-4-2018 ते 31-03-2019 |
| 5 | अप्पर मुख्य सचिव (नियोजन) | पदसिध्द सदस्य | 01-4-2018 ते 31-03-2019 |
| 6 | प्रधान सचिव मदत व पुनर्वसन | पदसिध्द सदस्य | 01-4-2018 ते 31-03-2019 |
| 7 | प्रधानसचिव (महसूल व वने) | पदसिध्द सदस्य | 01-4-2018 ते 31-03-2019 |
| 8 | प्रधान सचिव (कृषी) | पदसिध्द सदस्य | 01-4-2018 ते 31-03-2019 |
| 9 | सचिव (लाक्षेवि )जलसंपदा विभाग | पदसिध्द सदस्य | 01-4-2018 ते 31-03-2019 |
| 10 | प्रधान सचिव (जसं )जलसंपदा विभाग | पदसिध्द व्यवस्थापकीय संचालक | 01-4-2018 ते 31-03-2019 |
| 11 | कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद | पदसिध्द सदस्य सचिव | 01-4-2018 ते 31-03-2019 |

# गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ

**"सिंचनभवन", जालनारोड, औरंगाबाद-४३१ ००५**

दूरध्वनीक्र.(थेट) (०२४०) -२३४२०९६, कार्यालय २३४२०९७, फॅक्स २३३२४२६

E-mail: edgmidc_abad@wrd.maharashtra.gov.in

Website - www.godavarimahamandal.com


## वार्षिक अहवाल

2018 -2019

### 1. प्रास्ताविक :

गोदावरी नदीचे महाराष्ट्र राज्याच्या वाटयाचे पाणी उपयोगात आणण्यासाठी व गोदावरी नदीच्या खोऱ्यातील पाटबंधारे प्रकल्पास,लाभक्षेत्र विकासास तसेच जलविद्युत उर्जा निर्मिती योजनांना चालना देण्यासाठी व कार्यान्वित करण्यासाठी आणि पूर नियंत्रणासह इतर संलग्न व अनुषंगिक कामासाठी महाराष्ट्र शासनाने अधिनियमक्र.23, दिनांक17/08/1998 अन्वये गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाची स्थापना केलेली आहे.महामंडळाचा आर्थिक कारभार दिनांक 01/10/1998 पासून स्वतंत्रपणे सुरु झालेला आहे.

### 2. महामंडळाकडील कामाची व्याप्ती :

**महामंडळांतर्गत एकूण प्रकल्प —(जुन 2018 अखेरची माहिती खालीलप्रमाणे आहे.)**

महामंडळांतर्गत एकूण 1301 (विशेष प्रकल्प पुणे कडील 24 प्रकल्प धरुन) प्रकल्प (कृष्णा खोरे व तापी खोरेसह) त्यापैकी सिंचन व्यवस्थापनासाठी हस्तांतरीत झालेले कृष्णा खो-यातील 190 प्रकल्प व इडकॉम कडील बंद पडलेल्या 117 उपसा सिंचन योजना व वि.प्र.पुणे कडील 24 प्रकल्प वगळता गोदावरी खो-यातील 970 प्रकल्प आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे

| प्रकल्पाचा प्रकार | प्रकल्पांची संख्या (वि.प्र.पुणे कडील धरुन) | सिंचन क्षमता (ह.हेक्टर) (जुन-2018 अखेर निर्मित) | | | पाणीसाठा (दलघमी) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संकल्पीत प्रकल्पीय | निर्मित | उर्वरित | प्रकल्पीय | निर्मित | उर्वरित |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| मोठे | 21 | 1206.59 | 941.03 | 265.56 | 9245 | 8184 | 1061 |
| मध्यम | 90 | 249.71 | 219.564 | 30.146 | 1352 | 1285 | 67 |
| लघु | 1061 | 453.67 | 416.293 | 37.37 | 2180 | 1944 | 236 |
| उपसा | 12 | 39.36 | 3.21 | 36.15 | -- | -- | -- |
| एकुण | 1184 | 1949.33 | 1580.097 | 369.226 | 12777 | 11413 | 1364 |

**वरील प्रकल्पांपैकी सन 2019-20 मध्ये बांधकामाधीन असलेल्या प्रकल्पांचा तपशील पुढील प्रमाणे आहे.**

| प्रकल्पाचा प्रकार | प्रकल्पांची संख्या | किंमत (रु.कोटी) | | | सिंचन क्षमता (हेक्टर) | | | पाणीसाठा (दलघमी) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अद्यावत | खर्च (3/2019 अखेर) | उर्वरीत (3-4) | प्रकल्पीय | निर्मित (जुन-18 अखेर) | उर्वरीत | प्रकल्पीय | निर्मित (जुन-18 अखेर) | उर्वरीत |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| मोठे | 12 | 30987.25 | 16590.84 | 14396.40 | 747782 | 478965 | 268817 | 4347.07 | 3176.35 | 1170.71 |
| मध्यम | 7 | 3299.19 | 1933.34 | 1365.84 | 67950 | 31237 | 36713 | 282.86 | 256.60 | 26.25 |
| लघु | 38 | 2282.07 | 439.33 | 1842.739 | 27073 | 1368 | 25705 | 197.75 | 10.56 | 187.190 |
| एकूण | 57 | 36568.70 | 18963.52 | 17604.99 | 842805 | 511570 | 331265 | 4827.68 | 3443.52 | 1384.15 |

3. **महामंडळाचे कार्यक्षेत्र :**

महामंडळाचे कार्यक्षेत्र औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर या जिल्ह्यांचा पूर्ण भाग व बीड, उस्मानाबाद, अहमदनगर व नाशिक या जिल्हयातील गोदावरी खोऱ्या अंतर्गत येणारा भाग आहे. महामंडळा अंतर्गत सध्या (3) प्रादेशिक कार्यालय, बांधकामाधीन (7) मंडळ कार्यालये व सिंचन व्यवस्थापनाची (3) मंडळ कार्यालये,बांधकामाची (33) विभागीय कार्यालये व सिंचन व्यवस्थापनाची (15) विभागीय कार्यालये तसेच बांधकामाची (178) उपविभागीय कार्यालये व सिंचन व्यवस्थापनाची (103) उपविभाग कार्यरत आहेत.

**महामंडळाकडे मंजूर आकृतीबंधानुसार विविध संवर्गातील असलेली पदे खालील प्रमाणे आहेत.**

| **वर्ग** | **मंजूर पदे** | **कार्यरत पदे** | **रिक्त** |
|---|---|---|---|
| वर्ग-1 | 391 | 296 | 95 |
| वर्ग-2 | 1375 | 904 | 471 |
| वर्ग-3 | 8089 | 2989 | 5100 |
| वर्ग-4 | 2617 | 1295 | 1322 |
| **एकुण** | 12472 | 5484 | 6988 |

4. **मत्ता व दायित्वे :**

अधिनियम क्र. 23, दिनांक 17/08/1998 मधील तरतूदीनुसार महाराष्ट्र शासनाच्या मालकीची गोदावरी खोऱ्यातील सर्व मत्ता व दायित्व महामंडळाकडे वर्ग करण्यात आलेले असुन दि. 31/03/2018 रोजी मालमत्तेची भांडवली किंमत रू. 18525.25 कोटीची असुन त्या वर्षात शासनाकडून वेळोवेळी प्राप्त झालेल्या भांडवली अंशदानामुळे मार्च 2019 अखेर एकूण भाग भांडवली किंमत रु. 21069.71 कोटी इतकी झाली आहे.

5. **सन 2018-2019 मधील कामांची स्थिती :**

सन 2018-19 मध्ये एकुण 12771 हेक्टर सिंचन क्षमता व 62.62 दलघमी पाणी साठा निर्माण झाला आहे.

6. **सिंचन क्षमता निर्मिती :**

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ औरंगाबाद अंतर्गत पुर्ण प्रगत व भविष्यकालीन प्रकल्पाव्दारे एकुण 1949.33 ह. हे. सिंचन क्षमता निर्मितीचे उदिष्ट आहे. या पैकी जुन-2018 अखेर 1580.06 हजार हे.सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.

7. **सन 2018-19 मधील निधी ची उभारणी तपशील :** **(रु. कोटीत)**

| **सन 2018-19** | **मंजुर तरतुद** | **प्राप्त निधी** | **खर्च** |
|---|---|---|---|
| कामे ( विदर्भ व महाजनको वगळुन ) | 2995.0495 | 2962.0265 | 2458.7147 |
| वेतन व आस्थापना | 257.6994 | 174.2011 | 159.8256 |
| **एकुण** | 3252.7489 | 3136.2276 | 2618.5403 |

8 **लेखे :**

महामंडळाचे लेखे द्विनोंदी रोखीच्या पध्दतीने ठेवण्यात येतात सन 2018-19 चा ताळेबंद सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेला असुन ताळेबंदास नियामक मंडळाने दि. 10/07/2020 रोजी मान्यता प्रदान केलेली असून सदर ताळेबंद सोबत जोडण्यात आला आहे.

9 **गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद**

**सन 2014 ते 2019 या 5 वर्षातील महामंडळाची ठळक कामगिरी दर्शक टिप्पणी**

**महामंडळाची स्थापना :**

1.0 गोदावरी खोऱ्यातील महाराष्ट्राच्या वाटयाला आलेले पाणी द्रुतगतीने उपयोगातआणून खोऱ्यातील पाटबंधारे प्रकल्प, लाभक्षेत्र विकास प्रकल्प, जल विद्युत व उर्जा निर्मिती योजना इत्यादींना चालना देण्यासाठी महाराष्ट्र अधिनियम क्र.23, दिनांक 17/08/1998 अन्वये महामंडळाची स्थापना झाली व दिनांक 01/10/1998 पासून प्रत्यक्ष कामकाजास सुरुवात झाली.या महामंडळाचे कार्यक्षेत्र मराठवाडयातील 8 जिल्हे (औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, बीड, लातूर व उस्मानाबाद (अंशत:), उत्तर महाराष्ट्र प्रदेशातील अहमदनगर (अंशत:) व नाशिक हे 2 जिल्हे अशा एकूण 10 जिल्हयांतील व एकूण 105 तालुक्यातील असून यातील 36 तालुके अवर्षण प्रवण क्षेत्रातील आहेत.

2.0 **प्रकल्प संख्या : (जुन 2018 अखेर)**

महामंडळांतर्गत 21 मोठे, 90 मध्यम, व 1061 लघु पाटबंधारे, 12 उपसा, 117 इडकॉम असे एकूण 1301 (बांधकामाधीन व पुर्ण) प्रकल्प आहेत.

3.0 **पाणीसाठा निर्मिती :**

- या महामंडळांतर्गत प्रकल्पांची एकूण साठवण क्षमता 15420 द.ल.घ.मी. असून जुन 2019 अखेर निर्मित पाणीसाठा 14036 द.ल.घ.मी. एवढा आहे. यातील महामंडळ स्थापनेपूर्वी 9542 द.ल.घ.मी. व महामंडळ स्थापनेनंतर 1051 द.ल.घ.मी. व बांधकामाधीन प्रकल्पांव्दारे 3443 द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्माण झालेला आहे. सध्या जुन 2019 अखेर 1297 द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्मिती शिल्लक आहे.
- मागील 3 वर्षात सन-2016 ते सन-2019 मध्ये 222 द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्माण झालेला आहे. यात प्रामुख्याने, नांदूर मधमेश्वर प्रकल्पांतर्गत वाकी व भाम धरण (138 द.ल.घ.मी.), उर्ध्व पेनगंगा प्रकल्पांतर्गत उच्च पातळी बंधारे (24.45 द.ल.घ.मी.), बाभळी प्रकल्पांतर्गत बळेगाव बंधारा (25 द.ल.घ.मी.) पाणीसाठा निर्माण झालेला आहे.

- 4.0**सिंचन क्षमता निर्मिती : (जुन-2018 अखेर)**

या महामंडळांतर्गत 19.49 लक्ष हेक्टर (पीक क्षेत्र) प्रकल्पीय सिंचन क्षमते पैकी 15.80 लक्ष हेक्टर सिंचन क्षमता निर्मिती झाली आहे. सध्या 3.69 लक्ष हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करावयाची आहे.

## मागील तीन वर्षातील महामंडळांतर्गत प्रकल्पांच्या ठळक उपलब्धी :

5.0 या महामंडळांतर्गत मागील तीन वर्षामध्ये एकुण 03 प्रकल्पांचा पाणीसाठा व सिंचन क्षेत्र निर्माण झाले आहे.

| अ.क्र. | प्रकल्पाचे नाव | निर्मित पाणीसाठा (द.ल.घ.मी.) | निर्मित सिंचन क्षेत्र (हेक्टर) |
|---|---|---|---|
| 1 | सावळदबारा साठवण तलाव ता.सोयगाव जि. औरंगाबाद | 1.834 | 302 |
| 2 | दरेसरसम साठवण तलाव ता.हिमायतनगर जि. नांदेड | 2.510 | 258 |
| 3 | पळसखेडा बृहत लघु पाटबंधारे प्रकल्प ता. भोकरदन जि. जालना | 9.01 | 930 |

5.1 मागील तीन वर्षात महामंडळातील एक प्रकल्प पुर्ण झाला आहे.

5.2 मागील तीन वर्षातील वर्षवार सिंचन क्षमता निर्मिती पुढीलप्रमाणे आहे.

सन 2016-17 = 17884 हे. , सन 2017-18 = 6947 हे., सन 2018-19 = 12820 हे.

5.3 सन 2017, 2018 व 2019 मध्ये अनुक्रमे 16.09 दलघमी , 29.29 दलघमी व 109.98 दलघमी एवढी पाणीसाठा निर्मिती झाली आहे.

5.4 सन 2017,2018 व 2019 मध्ये अनुक्रमे 10.21 लक्ष हेक्टर, 9.89 लक्ष हेक्टर व 7.29 लक्ष हेक्टर एवढे प्रत्यक्ष सिंचन लाभक्षेत्र झाले आहे.

5.5 मागील तीन वर्षातील वर्षवार सिंचन व बिगरसिंचन पाणीपट्टी वसुली खालीलप्रमाणे आहे.

सन 2016-17 = 88.06 कोटी , सन 2017-18 = 109.70 कोटी,

सन 2018-19 = 191.95 कोटी

5.6 सन 2017, 2018 व 2019 मध्ये अनुक्रमे 10700 हे. 9554 हे. व 6544 हे. लाभक्षेत्र पाणी वापर संस्थांना हस्तांतरीत करण्यात आले आहे.

5.7 मागील तीन वर्षात पुढीलप्रमाणे प्रवाही कॅनल ऐवजी पाईप लाईन व्दारे पाणी पुरवठा करणे बाबत कार्यवाही करण्यात आली आहे.

सन 2016-17 = 2910 हे., सन 2017-18 = 6805 हे., सन 2018-19 = 3696 हे.

6.0 मांजरानदीवरील 11 बंधाऱ्यापैकी 10 बंधाऱ्याची कामे (बोरगांव-अंजनपूर, वांजरखेडा, कारसा पोहरेगांव, खुलगापूर, डोंगरगांव, धनेगांव , भुसणी, साई, शिवनी व होसुर जि.लातूर) पूर्ण झाली आहेत व उर्वरीत 1 बंधाऱ्यांचे (लासरा बंधारा) कामे अंतिम स्तरावर आहे. तसेच चार को.प.बंधा-याचे उ.पा.बं.धर्तीवर नुतनीकरण (देवळा, वागदरी, नागझरी, व बिंदगिहाळ) काम पुर्ण झालेले आहे.

सन 2012 ते 2015 या सलग 4 वर्षात मांजरा प्रकल्पा मध्ये उपयुक्त पाणीसाठा 'निरंक'होता. तथापि धरणाखालील बॅरेजेस मधील पाणीसाठा 2012 मध्ये 58 %, 2013 मध्ये 61 %, 2014 मध्ये 28 % व 2015

मध्ये 32 % होता. त्याचा उपयोग लातूर जिल्हयातील लातूर शहर व गावे यांना पिण्याच्या पाण्यासाठी व सिंचनासाठी उपयोग झाला.

7.0 गोदावरी व मांजरानदी वरील बंधाऱ्यांची कामे पूर्ण होऊन याव्दारे 24923 व 28541 हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे व त्याचा लाभ 174 गावांना (जिल्हा निहाय गांवे - अहमदनगर 1, औरंगाबाद 14, जालना- 30, परभणी- 25, हिंगोली 10, बीड-41 नांदेड 14 व लातूर 39) झाला आहे.

यामुळे गोदावरी नदीचे पात्रात पैठण धरणापासून राज्य सीमेपर्यंत सुमारे 460 कि.मी.लांबी मध्ये व मांजरा नदीचे पात्रात मांजरा धरणाचे खाली 120 कि.मी.लांबीमध्ये पाणी उपलब्ध राहणारआहे.

8.0 नांदूर मधमेश्वर प्रकल्पांतर्गत औरंगाबाद जिल्हयातील गंगापूर व वैजापूर या अवर्षण प्रवण तालुक्यातील क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळण्याचे दृष्टीने चार धरणांची कामे नाशिक जिल्हयामध्ये हाती घेण्यात आलेली आहेत. यापैकी मुकणे, भावली या धरणांची कामे( धरणाखालील बंधाऱ्यांसह) व नांदूर मधमेश्वर कालव्याचे काम पूर्ण झालेले आहे. भाम व वाकी धरणाचे काम भौतिकदृष्टया पुर्ण झालेले आहे. नांदूर मधमेश्वर कालव्यामुळे 43,860 हेक्टर एवढी सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे. या योजनेसाठी उपलब्ध झालेल्या पाण्यामधून गंगापूर व वैजापूर तालुक्यात सिंचनाचा लाभ मागील सहा वर्षापासून मिळू लागलेलाआहे.

9.0 निम्न दुधना प्रकल्पाच्या डावा कालव्याच्या 46 कि.मी. पर्यंत पाणी सोडून चाचणी घेण्यात आली. या कालव्याव्दारे सेलू तालुक्यातील (20 गावे)- 4440 हेक्टर, मानवत तालुक्यातील (4 गावे) 1375 हेक्टर व जिंतूर तालुक्यातील (3 गावे)- 900 हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे. निम्न दुधना प्रकल्पाच्या उजवा कालव्याच्या 15 कि.मी. पर्यंत पाणी सोडून चाचणी घेण्यात आली. या कालव्याव्दारे सेलू तालुक्यातील (3गावे)- 2750 हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे.

जलाशयावरील प्रस्तावित असलेल्या एकुण 4 उपसा सिंचन योजना (विडोळी उ.सिं.यो, कोरेगांव उ.सिं.यो, श्रीधर जवळा उ.सिं.यो. व सातोना उ.सिं.यो.) पुर्ण होवून कार्यान्वित झालेल्या आहेत. सदर चार उ.सिं.यो.व्दारे एकुण 8,897 हेक्टर क्षेत्रावर सिंचनाचा लाभ होत आहे. निम्न दुधना प्रकल्पाच्या कालव्याव्दारे जुन 2019 अखेर 41,812 हे. क्षेत्रावर सिंचन क्षमता निर्मिती झालेली आहे.

10.0 उर्ध्व कुंडलिका मध्यम प्रकल्पांतर्गत 18.77 दलघमी पाणीसाठा व 2800 हे. सिंचन क्षमता निर्माण् झाली असुन बीड जिल्हयातील वडवणी तालुक्यातील वडवणी, पुसरा,चिंचोटी, तिगांव, सोन्नाखोटा, चिंचवण, बाहेगव्हाण, मोरवड व चिंचाळा या 9 गावांना सिंचनाचा फायदा झाला आहे. या प्रकल्पाचे काम केंद्र शासीत अर्थ सहाय्यातून (PMKSY) पुर्ण करण्यात आले आहे. प्रकल्पास 15 कि.मी. लांबीचा कालवा असुन 0 ते 5 कि.मी. कालव्याचे काम बोगद्याव्दारे व उर्वरित कालव्याचे काम बंद नलिकाव्दारे (PDN) करण्यात आले आहे.

11.0 मुळा प्रकल्पांतर्गत वाघोली, ढोर जळगाव, मळेगाव को.प.बंधारे. व दिंडेवाडी मायनर या योजना पुर्ण झाल्या असून 432 हे. सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.

12.0 कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पांतर्गत मराठवाडयातील कृष्णा खोऱ्यातील उस्मानाबाद व बीड जिल्हयात पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पास शासनाने शासन निर्णय दि.27/08/2009 अन्वये रु.4845.05 कोटी रक्कमेच्या अंदाजपत्रकास सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार मराठवाडयासाठी उपलब्ध होणाऱ्या 23.66 अ.घ.फू. पाण्यापैकी प्रथम टप्प्यात 7 अ.घ.फू. पाणी वापराच्या नियोजनांतर्गत उपसा सिंचन योजना क्र.1, 2 व 3 ची कामे प्रगतीपथावर आहेत.

उपसा सिंचन योजना क्र.2 अंतर्गत घाटणे बॅरेजचे काम 2013 साली पुर्ण झाले असून या मध्ये 3.80 द.ल.घ.मी. पाणीसाठा व 650 हेक्टर सिंचन क्षेत्र निर्माण झाले आहे. तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग बॅरेज मध्ये 1 द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्माण झाला आहे व 171 हेक्टर सिंचन क्षेत्र निर्माण झाले. तुळजापूर तालुक्यातील रामदरा व पांगरदरवाडी साठवण तलावाचे काम पूर्ण झाले असून त्यात अनुक्रमे 3.237 व 0.466 द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्माण झाला आहे. भुम तालुक्यातील सोनगिरी साठवण तलावाव्दारे 1.87 द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्माण झाला आहे.तसेच इसरुप सा.त. व्दारे 1.57 द.ल.घ.मी व डोंगरी सिंदफळ सा.त. व्दारे 0.52 द.ल.घ.मी. पाणी साठा निर्माण झाला आहे.

कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पांतर्गत उपसा सिंचन योजना क्र 1.व 2 या योजनांना केंद्रिय पर्यावरण व वन मंत्रालयाचे पत्र क्र.-12011/58/2008-IA-I dt. 24.06.2015 अन्वये पर्यावरण मान्यता प्राप्त झाली आहे. आष्टी उपसा सिंचन योजना क्र 3.जि.बीड या योजनेस State level Environmental impact Assessment Authority, Mumbai यांनी त्यांचे पत्र दिनांक 2/3/2020 अन्वये पर्यावरण मान्यता प्राप्त झालेली आहे.

मराठवाडयातील अवर्षण प्रवण भागाला पाणी पुरविण्यासाठी अन्य उपाय योजना नसल्याने व सदर अवर्षण प्रवण भागास पाणी पुरविणे गरजेचे असल्याने प्रकल्प 4 वर्षात पूर्ण करण्यासाठी जलसंपदा विभागास वार्षिक प्राप्त होणाऱ्या रु8000.कोटी निधीमधून रु.1205 कोटी निधी या प्रकल्पासाठी राखुन ठेवुन उर्वरित निधी मा.राज्यपाल यांच्या निर्देशानुसार प्रदेशनिहाय वाटप करण्याबाबत मा.राज्यपाल महोदयांना विनंती करण्यात येवुन दि. 04.10.2016 रोजी औरंगाबाद येथे झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली . तसे सन 2019-20 अर्थ संकल्पात कृष्णा मराठवाडा प्रकल्पास (कृष्णा भिमा स्थिरीकरणासह) रु. 500 कोटीचा निधी उपलब्ध करून देण्यात आला.

13.0 पश्चिम वाहिनी नद्यांचे समुद्रात वाहून जाणारे पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्यासाठी 30 वळण योजनांपैकी 17 वळण योजनांच्या कामांना प्रशासकीय मान्यता प्राप्त असून त्यापैकी 12 प्रवाही वळण योजना पुर्ण झाल्या असुन या योजना मध्ये एकुण 12.65 द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्माण झाला आहे. 7 वळण योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. उर्वरीत 11 योजना सर्वेक्षणाधीन आहेत.

14.0 लातूर पध्दतीच्या बंधाऱ्याची कामे :

जुन्या को.प.बं. चे नुतनीकरण करुन लातुर पध्दतीच्या बंधाऱ्यांची कामे प्रस्तावित आहेत. को.प.ब. नुतनीकरण अंतर्गत मांजरा नदीवर 3, तेरणा नदीवर 8 व रेणा नदीवर 3 असे 14 को.प.ब. आहेत. या पैकी बिंदगिहाळ, मदनसुरी, किल्लारी क्र. 2, नागझरी,धनसरगाव, रेणापूर व खरोळा या सात लातूर पध्दतीच्या बंधाऱ्याचे कामपूर्ण झाले आहे.

15.0 बाभळी बंधाऱ्याची मा. सर्वोच्च न्यायालयात याचिका होती. सन 2013 साली याचा निकाल महाराष्ट्र शासनाच्या बाजूने लागला व ऑक्टोंबर 2013 मध्ये या बंधाऱ्यात प्रथमत: पाणीसाठा निर्माण झाला. बाभळी बॅरेजव्दारे 55.49 द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्माण झाला व 6395 हे. सिंचन क्षमता निर्माण झाले. त्याचा लाभ बिलोली, धर्माबाद, नायगाव, उमरी या तालुक्यातील 35 गावांस झाला.

16.0 उर्ध्व पेनगंगा प्रकल्प :

ईसापूर व सापळी धरणा पैकी ईसापूर धरण पूर्ण. संपूर्णपणे पाणीसाठा करण्यात येत आहे.सापळी धरणाचे काम पर्यावरण मान्यते अभावी सूरु झालेले नाही. डाव्या कालव्याची लांबी 84 कि.मी.असून संपूर्ण लांबीत सिंचन निर्मिती झालेली आहे. उजवा कालव्याची एकुण लांबी 140 कि.मी.असून त्यापैकी 120 कि.मी.काम पूर्ण होवून सिंचन निर्मिती झालेली आहे. या प्रकल्पावर वेग वर्धित सिंचन लाभ योजने अंतर्गत कालव्याची व वितरिकेची कामे करण्यात येत आहे. सदर प्रकल्पावर हिंगोली व नांदेड जिल्हयातील 95774 हेक्टर क्षेत्रावर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.

17.0 उर्ध्व मानार उपसा सिंचन योजना :

उर्ध्व मानार उपसा सिंचन योजना सन 2011 मध्ये कार्यान्वित झाली असून याव्दारे 2,048 हेक्टर सिंचन क्षेत्र निर्माण झाले आहे. त्याचा फायदा लातूर जिल्हयातील अहमदपूर तालुक्यातील शेतकऱ्यांना झाला आहे.

18.0 तिरु मध्यम प्रकल्प उंची वाढविणे :

तिरु मध्यम प्रकल्प उंची वाढविणे या योजनेचे काम सन 2012 मध्ये पूर्ण करण्यात आले आहे. प्रकल्पामध्ये 4.47 द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्माण झाला असून 682 हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आले आहे. त्याचा फायदा लातूर जिल्हयातील रेणापूर व लातूर तालुक्यातील शेतकऱ्यांना झाला आहे.

## 19.0 सन 2018-19 मधील उपलब्धी

1) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम 2005 या अधिनियमाच्या कलम-16 मधील तरतुदीच्या अनुषंगाने मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार दिनांक 11-02-2019 रोजी झालेल्या राज्य जलपरिषदेच्या सहाव्या बैठकीत “एकात्मीक राज्य जल आराखडा यास मान्यता प्राप्त झाली. अशा प्रकाराचा आराखडा संपुर्ण देशात प्रथमत: करण्यात आलेला आहे.

2) सन 2018-19 मध्ये प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेअंतर्गत उर्ध्व कुंडलिका मध्यम प्रकल्पाचे काम भौतिक दृष्टया पुर्ण झाले आहे. तसेच दरेसरसम सा.त., सावळदबारा सा.त., चारुतांडा सा.त., करडगाव को.प.बं., भेंडेवाडी सा.त. या ल.पा. प्रकल्पांसह एकुण 6 प्रकल्पांची कामे पुर्ण झाली आहेत. तसेच या वर्षात 12771 हे. सिंचन क्षमता निर्मीती व 62.62 द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्मीती झाली आहे.

**3) गोदावरी नदीवरील खालील बंधाऱ्यांची कामे पूर्ण झाली असून सिंचन क्षमता निर्माण झालेली आहे.**

- **आपेगांव बॅरेज** चे काम 2010 साली पुर्ण झाले असून या मध्ये 7.00 द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्माण झाला व 870 हे सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. त्याचा लाभ पैठण तालुक्यातील (10) गावे , शेवगाव तालुक्यातील (1) गाव व गेवराई तालुक्यातील (1) गावास झाला.
- **हिरडपुरी बॅरेज** चे काम 2009 साली पुर्ण झाले असून या मध्ये 3.00 द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्माण झाला व 1118 हे सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. त्याचा लाभ पैठण तालुक्यातील (4) गावे , व गेवराई तालुक्यातील (4) गावास झाला.
- **जोगलादेवी बॅरेज** चे काम 2010 साली पुर्ण झाले असून या मध्ये 10.00 द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्माण झाला व 1083 हे सिंचनक्षमता निर्माण झाली आहे. त्याचा लाभ घनसावंगी तालुक्यातील (8) गावे , व गेवराई तालुक्यातील (8) गावास झाला.
- **मंगरूळ बॅरेज** चे काम 2009 साली पुर्ण झाले असून या मध्ये 25.00 द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्माण झाला व 3067 हे सिंचनक्षमता निर्माण झाली आहे. त्याचा लाभ घनसावंगी तालुक्यातील (7) गावे, व गेवराई तालुक्यातील (6) गावास झाला.
- **राजाटाकळी बॅरेज** चे काम 2009 साली पुर्ण झाले असून या मध्ये 25.00 द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्माण झाला व 3044 हे सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. त्याचा लाभ घनसावंगी तालुक्यातील (6) गावे , व गेवराई तालुक्यातील (6) गांवे व माजलगाव तालुक्यातील (1) गावास झाला.
- **लोणीसावंगी बॅरेज** चे काम 2009 साली पुर्ण झाले असून या मध्ये 30.00 द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्माण झाला व 3942 हे सिंचनक्षमता निर्माण झाली आहे. त्याचा लाभ पाथ्री तालुक्यातील (1) गाव, परतुर तालुक्यातील (4) गावे, घनसावंगी तालुक्यातील (2) गांवे, माजलगाव तालुक्यातील (8) गावास झाला.
- **ढालेगांव बॅरेज** चे काम 2011 साली पुर्ण झाले असून या मध्ये 14.87 द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्माण झाला व 2242 हे सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. त्याचा लाभ पाथ्री तालुक्यातील (10) गावे, माजलगाव तालुक्यातील (3) गावास झाला.
- **मुदगल बॅरेज** चे काम 2012 साली पुर्ण झाले असून या मध्ये 11.87 द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्माण झाला व 1907 हे सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. त्याचा लाभ पाथ्री तालुक्यातील (8) गावे,सोनपेठ तालुक्यातील (4) गावे व माजलगाव तालुक्यातील (3) गावे व परळी तालुक्यातील (1) गावास झाला.

- **मुळी बॅरेज** चे काम 2011 साली पुर्ण झाले असून या मध्ये 11.35 द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्माण झाला व 1705 हे सिंचनक्षमता निर्माण झाली आहे. त्याचा लाभ गंगाखेड तालुक्यातील (8) गावे,व सोनपेठ तालुक्यातील (3) गावास झाला.
- **दिग्रस बॅरेज** चे काम 2010 साली पुर्ण झाले असून या मध्ये 63.85 द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्माण झाला व 3618 हे सिंचन क्षमता निर्माण झाली आहे. त्याचा लाभ पुर्णा तालुक्यातील (10) गावे,परभणी तालुक्यातील (3) गावे व पालम तालुक्यातील (9) गावे व गंगाखेड तालुक्यातील (6) गावास झाला.
- **आमदुरा बॅरेज** चे काम 2011 साली पुर्ण झाले असून या मध्ये 23.71 द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्माण झाला व 1002 हे सिंचनक्षमता निर्माण झाले. त्याचा लाभ मुदखेड तालुक्यातील (6) गावे, नांदेडतालुक्यातील (8) गावास झाला.

4) **मांजरा नदीवरील बंधारे**

- **वांजरखेडा बॅरेजचे** काम 2008 साली पुर्ण झाले असून यामध्ये 3.60 द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्माण झाला व 1998 हे.सिंचनक्षमता निर्माण झाली. त्याचा लाभ लातूर तालुक्यातील (5) गावास पिण्यासाठी झाला.
- **कासरा पोहरेगांव बॅरेजचे** काम 2008 साली पुर्ण झाले असूनयामध्ये 3.41 द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्माण झाला व 1990 हे.सिंचन क्षमता निर्माण झाली. त्याचा लाभ लातूर तालुक्यातील (9) गावास पिण्यासाठी झाला.
- **डोंगरगाव बॅरेजचे काम** 2011 साली पुर्ण झाले असून यामध्ये 7.90 द.ल.घ.मी.पाणीसाठा निर्माण झाला व 1780 हे.सिंचन क्षमता निर्माण झाली. त्याचा लाभ औसा तालुक्यातील (8) गावास पिण्यासाठी झाला.
- **खुलगापूर बॅरेजचे काम** 2009 साली पुर्ण झाले असून यामध्ये 9.72 द.ल.घ.मी.पाणीसाठा निर्माण झाला व 1950 हे.सिंचनक्षमता निर्माण झाली. त्याचा लाभ लातूरतालुक्यातील (9) गावास पिण्यासाठी झाला.
- **धनेगांव बॅरेजचे** काम 2011साली पुर्ण झाले असून यामध्ये 11.30 द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्माण झाला व 2196 हे.सिंचनक्षमता निर्माण झाली. त्याचा लाभ निलंगा तालुक्यातील (20) गावास पिण्यासाठी झाला.
- **भुसणी बॅरेजचे काम** 2008 साली पुर्ण झाले असून यामध्ये 1.49 द.ल.घ.मी.पाणीसाठा निर्माण झाला व 310 हे.सिंचन क्षमता निर्माण झाली. त्याचा लाभ औसा तालुक्यातील (4) गावास पिण्यासाठी झाला.
- **बोरगांव अंजनपूर बॅरेजचे** काम 2009 साली पुर्ण झाले असून यामध्ये 1.50 द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्माण झाला व 310 हे.सिंचन क्षमता निर्माण झाली. त्याचा लाभ लातूर तालुक्यातील (4) गावास पिण्यासाठी झाला.
- **साई बॅरेजचे काम** 2012साली पुर्ण झाले असुन यामध्ये 3.47 दलघमी पाणीसाठा निर्माण झाला व 1995 हे. सिंचन क्षमाता निर्माण झाली. त्याचा लाभ लातुर शहराला पिण्यासाठी झाला आहे.
- **शिवनी बॅरेजचे काम** 2016 साली पुर्ण झाले असुन यामध्ये 9.81 दलघमी पाणीसाठा निर्माण झाला व 1950 हे. सिंचन क्षमाता निर्माण झाली. त्याचा लाभ लातुर तालुक्यातील 9 गावास झाला आहे.

- **होसुर बॅरेजचे काम** 2016 साली पुर्ण झाले असुन यामध्ये 2.25 दलघमी पाणीसाठा निर्माण झाला व 299 हे. सिंचन क्षमता निर्माण झाली. त्याचा लाभ लातुर तालुक्यातील 1 गावास झाला आहे.

(क्रि.भा. कुलकर्णी)
कार्यकारी संचालक

# सतिश नागरे अँड असोसिएटस्
## सनदी लेखापाल

# गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ औरंगाबाद

(महाराष्ट्र शासन अंगिकृत उपक्रम)

# वार्षिक ताळेबंद
# सन 2018-19
## (मराठी)

**गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद**
**ताळेबंद ३१ मार्च, २०१९**

| ३१-०३-२०१८ | दायित्व | तक्ता | ३१-०३-२०१९ | ३१-०३-२०१८ | मालमत्ता | तक्ता | ३१-०३-२०१९ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १,८५,२५,२५,१५,७६५ | भांडवली अंशदान महाराष्ट्र शासनाकडून | १ | २,१०,६९,७१,२३,५६५ | २,५७,११,८४,१४,१५९ | स्थावर मालमत्ता | ४ | २,७७,५२,८६,५५,५६५ |
| | | | | १८,४०,१४,३८,७९५ | चालू, संपत्ती, कर्ज व अग्रिम | ५ | २९,७३,३०,४३,३६९ |
| ८३,८२,९५,२९,१५७ | अनुदान | २ | ८९,७७,६३,८६,१५७ | | | | |
| ६,४३,७८,०८,०३१ | चालू दायित्व व तरतुदी | ३ | ६,७८,८१,८९,२१३ | | | | |
| **२,७५,५१,९८,५२,९५३** | **एकूण** | | **३,०७,२६,१६,९८,९३५** | **२,७५,५१,९८,५२,९५३** | **एकूण** | | **३,०७,२६,१६,९८,९३५** |

**दिलेल्या माहितीनुसार बनविलेले ताळेबंद**

**सतीश नगरे अँड असोसिएट्स करिता**
**चार्टड अकाऊन्टटस**
**संस्था नोंदणी क्रमांक - 109325W**

SATISH NAGRE & ASSOCIATES * MUMBAI M. NO.: 37191 * CHARTERED ACCOUNTANTS

**सतीश नगरे**
**प्रोप्रायटर**
**सभासद क्रमांक - 037191**

**ठिकाण:**
**दिनांक :** 23/11/2020

**गोदावरी मराठवाडा पाठबंधारे विकास महामंडळ**

**कार्यकारी संचालक**

**मु ले वि अधिकारी**

## गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद

### ३१ मार्च २०१९ अखेर संपलेल्या वर्षाचे प्रकल्प विकास खाते

| ३१-०३-२०१८ | खर्च | तक्ता | ३१-०३-२०१९ | ३१-०३-२०१८ | उत्पन्न | तक्ता | ३१-०३-२०१९ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४६,५९,८६,२४५ | प्रकल्प कामावरील खर्च | ६ | ६५,०३,१८,८८३ | ९१,१९,०९,५६१ | पाणी विक्री उत्पन्न | | १,५९,९७,२९,४६६ |
| १,४०,०५,७५,९२३ | मुख्यालय प्रशासकीय खर्च | ७ | १,६४,३४,३८,६१७ | १,१२,२६,३५९ | भाडे | | ८७,७७,१४६ |
| ० | व्याज प्रदान वित्तीय खर्च | ८ | ० | ४०,३३,६४,०५८ | व्याज मिळकत | १० | ४४,६९,८८,०९० |
| १,०८,६०,६४,४९० | घसारा | ४ | १,०६,७४,५५,३२६ | १,०३,०६,८५,०९२ | इतर उत्पन्न | ११ | १,२८,७५,०४,२६३ |
| १४,९२,२३५ | कर्ज उभारणी निर्लेखित खर्च | ९ | ० | ५९,६९,३३,८२२ | चालू प्रकल्प कामावरील वर्ग केलेला निव्वळ भांडवली खर्च | | १,८२,१३,८६१ |
| २,९५,४१,१८,८९३ | **एकूण** | | ३,३६,१२,१२,८२६ | २,९५,४१,१८,८९३ | **एकूण** | | ३,३६,१२,१२,८२६ |

**दिलेल्या माहितीनुसार बनविलेले ताळेबंद**

**सतीश नगरे अँड असोसिएट्स करिता**
**चार्टर्ड अकाऊन्टटस**
**संस्था नोंदणी क्रमांक - 109325W**

SATISH NAGRE & ASSOCIATES ★ CHARTERED ACCOUNTANTS ★ MUMBAI M. NO.: 37191

**सतीश नगरे**
**प्रोप्रायटर**
**सभासद क्रमांक - 037191**

**ठिकाण:**
**दिनांक :** 23/11/2020

**गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ**

**कार्यकारी संचालक**

**मु ले वि अधिकारी**

**गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद**

**मार्च ३१, २०१९ च्या ताळेबंदात अंतर्भूत असलेला तक्ता**

| विवरण | ३१-०३-२०१९ | ३१-०३-२०१८ |
|---|---|---|
| **तक्ता क्र १** | | |
| **शासकीय अंशदान** | | |
| महामंडळाला वर्ग केलेल्या मालमत्तेची निव्वळ किंमत | १,८५,२५,२५,१५,७६५ | १,६७,८३,३०,२१,७६५ |
| महाराष्ट्र शासनाने चालू वर्षात दिलेले अंशदान | २५,४१,५४,१७,८०० | १७,३८,५९,०२,००० |
| अधिक : मकृखोविम, विविम, तापी यांनी महामंडळास वर्ग केलेली | २,९१,९०,००० | ३,३५,९२,००० |
| | **२,१०,६९,७१,२३,५६५** | **१,८५,२५,२५,१५,७६५** |
| **तक्ता क्र २** | | |
| **अनुदान** | | |
| महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त झालेले वर्षभरातील अनुदान | | |
| महसूल खात्यातून पुनर्वसित प्रकल्पग्रस्त योजना व इतर तत्ससंबंधात | १,३३,९१,८६,५३२ | १,३३,९१,८६,५३२ |
| कर्ज रोख व्याजासाठी | ११,२३,४७,२५,११० | ११,२३,४७,२५,११० |
| वनवासी सुधार प्रकल्प अनुदान | १,६०,८८,८३,३५० | १,५४,८०,६४,३५० |
| इतर अनुदान | ४,७२,८५,३६,०७८ | ४,११,८५,७३,०७८ |
| कर्जरोखे परत करण्यासाठी मिळालेले अनुदान | १६,३९,११,००,००० | १६,३९,११,००,००० |
| ए आय बी पी अनुदान | ४४,२९,६४,४१,००० | ३९,०३,५३,६६,००० |
| टंचाई अनुदान | २,९७,३९,१६,००० | २,९७,३९,१६,००० |
| लेन्डी प्रकल्पासाठी अनुदान | १,९७,२३,६७,००० | १,९७,२३,६७,००० |
| पूरग्रस्त पुर्नवसन अनुदान | १,६०,३९,०६,००० | १,५८,८९,०६,००० |
| महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय सहकारी निगम | २,३०,२०,५४,००० | २,३०,२०,५४,००० |
| बँक व इतर व्याज | १,३२,४४,७१,०८७ | १,३२,४४,७१,०८७ |
| **एकूण** | **८९,७७,६३,८६,१५७** | **८३,८२,९५,२९,१५७** |

SATISH NAGRE & ASSOCIATES * CHARTERED ACCOUNTANTS * MUMBAI M.NO.: 37191

**गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद**

**मार्च ३१, २०१९ च्या ताळेबंदात अंतर्भूत असलेला तक्ता**

| विवरण | ३१-०३-२०१९ | ३१-०३-२०१८ |
|---|---|---|
| **तक्ता क्र 3** | | |
| **चालू दायित्व व तरतुदी** | | |
| सामुग्रीपोटी किरकोळ देणी | १,२५,१६,५५८ | १,२५,१६,५५८ |
| इतर खर्चापोटी दायित्व | ६,६८,०५,४३७ | ६,६९,६६,५८२ |
| इतर खर्चापोटी दायित्व ०१/१०/९८ पूर्वी | ९२,५३,५६,२३२ | ९२,५३,०५,५०१ |
| **ठेवी** | | |
| कंत्राटदाराकडून | २,४३,७४,०९,८६७ | २,३४,९६,१९,३८५ |
| कर्मचाऱ्याकडून | २,५८,५५,४६८ | २,९१,४४,२८८ |
| इतर | १,३६,४३,००,८०२ | १,३०,४४,६१,२१० |
| देय आस्थापना खर्च | १,५४,२३,२२९ | १,५४,३१,३१६ |
| देय आस्थापना खर्च कोषागर | १,११,९९,२१७ | १,१३,७७,९२५ |
| शासकीय देणे | ५०,०९,५४,२५५ | २८,३४,३३,४२२ |
| अग्रीम महाजेनको | १,४२,००,००,००० | १,४२,००,००,००० |
| उगम कर व विक्री कर कपात | ८३,६८,१४८ | १,९५,५१,८४४ |
| **एकूण** | **६,७८,८१,८९,२१३** | **६,४३,७८,०८,०३१** |

SATISH NAGRE & ASSOCIATES
MUMBAI
M. NO.: 37191
CHARTERED ACCOUNTANTS

## गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद
### मार्च ३१, २०१९ च्या ताळेबंदात अंतभूत असलेला तक्ता
### तक्ता ४ : स्थावर मालमत्ता

| विवरण | ३१-०३-२०१८ | या वर्षात वर्ग केलेली रु | या वर्षात वाढीव रु | एकूण | या वर्षातील विक्री वर्ग | या वर्षातील घसार | ३१-०३-२०१९ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **पूर्ण झालेले प्रकल्प** | | | | | | | |
| मोठे प्रकल्प | ४५,२०,२२,८९,२०२ | | २५,७१,५६,२७२ | ४५,४५,९४,४५,४७४ | ० | ९०,९१,८८,९०९ | ४४,५५,०२,५६,५६५ |
| मध्यम प्रकल्प | १,१५,१०,९०,७६५ | | १५,१५,५०,४९२ | १,३०,२६,४१,२५७ | ० | २,६०,५२,८२५ | १,२७,६५,८८,४३२ |
| लहान प्रकल्प | २,७३,९६,०६,०७५ | | ३,७२,६४,०२९ | २,७७,६८,७०,१०४ | ० | ५,५५,३७,४०२ | २,७२,१३,३२,७०२ |
| **इमारत** | | | | | | | |
| निवासी | ४६,६६,०८,८४९ | | ० | ४६,६६,०८,८४९ | ० | २,३३,३०,४४२ | ४४,३२,७८,४०७ |
| अनिवासीकार्यालयीन | २३,१२,५८,३९८ | | ० | २३,१२,५८,३९८ | ० | २,३१,२५,८४० | २०,८१,३२,५५८ |
| तात्पुरते | ४,१४,०२,६३५ | | ० | ४,१४,०२,६३५ | ० | ४१,४०,२६४ | ३,७२,६२,३७१ |
| यंत्रसामुग्री | १२,०४,४४,३९८ | | ० | १२,०४,४४,३९८ | ० | १,२०,४४,४४० | १०,८३,९९,९५८ |
| वाहन | ५,७६,०९,२६० | | ० | ५,७६,०९,२६० | ० | ८६,४१,३८९ | ४,८९,६७,८७१ |
| कार्यालयीन साहित्य | २,६२,९६,८८७ | | ६,२७,९८६ | २,६९,२४,८७३ | ० | २६,९२,४८७ | २,४२,३२,३८६ |
| फर्निचर व फिक्चर | ५,३९,९५,३०२ | | ३१,२५० | ५,४०,२६,५५२ | ० | २७,०१,३२८ | ५,१३,२५,२२४ |
| **एकूण अ** | **५०,०९,०६,०१,७७१** | **०** | **४४,६६,३०,०२९** | **५०,५३,७२,३१,८००** | **०** | **१,०६,७४,५५,३२६** | **४९,४६,९७,७६,४७४** |
| चालू असलेली प्रकल्प कामे | | | | | | | |
| मोठे प्रकल्प | १,०५,०८,६९,१८,१२७ | | १३,०१,२७,०७,०९७ | १,१८,०९,९६,२५,२२४ | | | १,१८,०९,९६,२५,२२४ |
| मध्यम प्रकल्प | ४०,८९,५७,१२,६०८ | | ३,३०,५१,३२,५६५ | ४४,२०,०८,४५,१७३ | | | ४४,२०,०८,४५,१७३ |
| लहान प्रकल्प | ४०,४२,७०,२५,७५५ | | ४,६९,०७,२७,२०८ | ४५,११,७७,५२,९६३ | | | ४५,११,७७,५२,९६३ |
| जलविद्युत प्रकल्प | १,२१,१५,७८,११७ | | ४२,८५,९७२ | १,२१,५८,६४,८८९ | | | १,२१,५८,६४,८८९ |
| **एकूण ब** | **१,८७,६२,१२,३५,४०७** | **०** | **२१,०१,२८,५२,८४२** | **२,०८,६३,४०,८८,२४९** | **०** | **०** | **२,०८,६३,४०,८८,२४९** |
| **एकूण क (अ+ब)** | **२,३७,७१,१८,३७,१७८** | **०** | **२१,४५,९४,८२,८७१** | **२,५९,१७,१३,२०,०४९** | **०** | **१,०६,७४,५५,३२६** | **२,५८,१०,३८,६४,७२३** |
| मराठवाडा विभागाच्या फायद्यासाठी मकृखोविम ने कृष्णा खोऱ्यात | १,४७,९०,८८,००० | ० | ० | १,४७,९०,८८,००० | ० | ० | १,४७,९०,८८,००० |
| निव्वळ तुट या वर्षातील प्रकल्प विकास खात्यातून वर्ग केलेले व प्रकल्पावर खर्ची | १७,९२,७४,८८,९८० | ० | १,८२,१३,८६१ | १७,९४,५७,०२,८४१ | ० | ० | १७,९४,५७,०२,८४१ |
| **एकूण ( क + ड + इ )** | **२,५७,११,८४,१४,१५९** | **०** | **२१,४७,७६,९६,७३२** | **२,७८,५९,६१,१०,८९०** | **०** | **१,०६,७४,५५,३२६** | **२,७७,५२,८६,५५,५६५** |
| **मागील वर्ष** | **२,३५,४८,८५,५५,०५२** | **०** | **२२,७१,६१,४६,३८६** | **२,५८,२०,४७,०१,४३९** | **२,२२,७९०** | **१,०८,६०,६४,४९०** | **२,५७,११,८४,१४,१५९** |

टीप - पूर्ण झालेली कामे आणि चालू असलेली प्रकल्प कामे यात धरण. कालवे, रस्ते, इत्यादी कामांचा समावेश आहे

SATISH NAGRE & ASSOCIATES
MUMBAI
M. NO.: 37191
CHARTERED ACCOUNTANTS

## गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद
## मार्च ३१, २०१९ च्या ताळेबंदात अंतर्भूत असलेला तक्ता

| विवरण | ३१-०३-२०१९ | ३१-०३-२०१८ |
|---|---|---|
| **तक्ता क्र ५** | | |
| **चल संपत्ती उधार कर्ज व अग्रीम** | | |
| **अ चलसंपत्ती** | | |
| बांधकाम साहित्य साठा व इतर सामुग्री व्यवस्थापनाच्या मोजमाप व मंजूरीप्रमाणे | १,६०,१४,८२३ | १,६०,१४,८२३ |
| उगम कर कपात | ८१,५८,१११ | ७९,६९,०६३ |
| **रोख व बँक शिल्कक** | | |
| रोख शिल्लक | ७,३९,३९,६९७ | ७,२७,०९,८३४ |
| **धनाकोषातील रक्कमा** | | |
| चालू खाते | १२,४९,९६,८९,५६३ | ९८,८२,७७,१९३ |
| बचत खाते | ० | १,९४,७०,७९,५०९ |
| स्वीय्य प्रपंजी खाते | २,३६,३३,८०,१२९ | ३,६३,११,७९,२९६ |
| लघु मुदत ठेवी | ३,७७,२७,१०,९०९ | ३,८८,५४,९६,९०९ |
| **एकूण** | **१८,७३,३८,९३,२३२** | **१०,५४,८७,२६,६२७** |
| बयेणी व अग्रीम (तारण नसलेली परंतु उपलब्ध माहितीनुसार सुरक्षित) | | |
| रोख इतर प्रकारे योग्य किमतीत येणी असलेली रक्कम | १,४१,८४,३५,२३० | १,४१,८४,२५,१५३ |
| पुरवठादाराना व कंत्राटदारांना अग्रीम | ३३,२९,२५,७४० | ३३,२८,६५,७४० |
| विशेष भूसंपादन अधिकारी यांना दिलेले अग्रीम | ५२,५१,००,१६३ | ५२,५१,००,१६३ |
| कर्मचारी यांना दिलेले अग्रीम | ५,७९,२२,११२ | ५,७८,३०,०११ |
| महाराष्ट्र शासनाकडून येणी | ३४,६९,३८,०१५ | ३४,६९,३८,०१५ |
| म रा वि म दूरध्वनी व इतर करिता ठेवी | ४,०१,०१,५४५ | ४,०१,०१,५४५ |
| न ताळमेळ घातलेला समायोजन लेखा | ८,२७,७७,२७,३३२ | ५,१३,१४,५१,५४१ |
| **एकूण ब** | **१०,९९,९१,५०,१३७** | **७,८५,२७,१२,१६८** |
| **एकूण (अ+ब)** | **२९,७३,३०,४३,३६९** | **१८,४०,१४,३८,७९५** |

## गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद
### मार्च ३१, २०१९ च्या ताळेबंदात अंतर्भूत असलेला तक्ता

| विवरण | ३१-०३-२०१९ | ३१-०३-२०१८ |
|---|---|---|
| **तक्ता क्र ६** | | |
| **प्रकल्प कामावरील दे. ब. दू. खर्च** | | |
| मोठे प्रकल्प | ४६,४५,८१,३४२ | ३४,४९,०५,३८५ |
| मध्यम प्रकल्प | ८,४१,१०,६६६ | ५,५३,६८,३७६ |
| लहान प्रकल्प | १०,०७,१९,९५३ | ६,४९,७७,०९० |
| इमारती आणि उपकरणे देखभाल खर्च | ९,०६,९२२ | ७,३५,३९४ |
| **एकूण** | **६५,०३,१८,८८३** | **४६,५९,८६,२४५** |
| **तक्ता क्र ७** | | |
| मुख्य कार्यालय प्रशासकीय खर्च | | |
| वेतन | ३,७७,२०,३४८ | ३,७७,२५,०५० |
| प्रवास खर्च | ९,३५,५५२ | ९,६९,९५४ |
| अंतर्गत कराविषयक लेखापरीक्षण शुल्क महालेखापरीक्षण शुल्क | ० | २,०६,१४० |
| AG लेखापरीक्षण शुल्क | ० | ४९,५२,९६५ |
| सल्लाविषयक खर्च | ० | २,५०,२३१ |
| कार्यालयीन खर्च | ४४,६२,७५३ | ८,३९,७३० |
| शासनास आस्थापना खर्चाचा परतावा | ६६,०५,६०,००० | ७६,१६,९७,००० |
| एमकेव्हीडीसी योगदान (बिगर सिंचन पाणीपट्टी) | ९३,९७,५९,९६४ | ५९,३९,३४,८५३ |
| **एकूण** | **१,६४,३४,३८,६१७** | **१,४०,०५,७५,९२३** |
| **तक्ता क्र ८** | | |
| **वित्तीय खर्च** | | |
| अ कर्ज रोख्यावरील व्याज | | |
| मालिका ६ | ० | ० |
| **एकूण** | **०** | **०** |
| **तक्ता क्र ९** | | |
| संकिर्ण खर्च निर्लेखीत न केलेला कर्जरोख्यावरील खर्च | | |
| नोंदणी अधिकाऱ्यांचे शुल्क | ० | १४,९२,२३५ |
| **एकूण** | ० | १४,९२,२३५ |
| **तक्ता क्र १०** | | |
| **ठेवीवरील व्याज उत्पन्न** | | |
| कंत्राटदाराकडील व इतर | १३,१९,४४,५२३ | २,८९,७०,४५६ |
| व्याज FD | ३१,५०,४३,५६७ | ३७,४३,९३,६०२ |
| **एकूण** | **४४,६९,८८,०९०** | **४०,३३,६४,०५८** |
| **तक्ता क्र ११** | | |
| **इतर उत्पन्न** | | |
| कंत्राटदाराकडून नोंदणी शुल्क | ८,२०,४३० | ० |
| निविदा विक्री उत्पन्न | ३४,४८,०३८ | २८,०१,५३७ |
| सयंत्र व हत्यारे यांच्यापासून मिळालेले भाडे | ५१,८३७ | ४,९९,६७८ |
| मत्स्य व्यवसाय अधिकारापासून | ७१,६७,१२९ | ४,३४,४१,८६५ |
| दंड व व्याज | २,३१,६६,३५५ | २,१६,१६४ |
| किरकोळ प्राप्ती | १०,३४,६२,००५ | ११,९२,५६,५५३ |
| एमकेव्हीडीसी प्राप्त हिस्सा | १,१४,९३,८८,४६९ | ८६,४४,६९,२९५ |
| **एकूण** | **१,२८,७५,०४,२६३** | **१,०३,०६,८५,०९२** |

SATISH NAGRE & ASSOCIATES * CHARTERED ACCOUNTANTS * MUMBAI M. NO.: 37191

(RAKESH AGARWAL)
M.Com. FCA

RAKESH R. AGARWAL & ASSOCIATES
CHARTERED ACCOUNTANTS

M-2, SHARDA CHEMBER NO-1, 31 K.N.ROAD, BHAT BAZAR, MUMBAI-400009. PH. NO.02223716074

## स्वतंत्र लेखा परिक्षण अहवाल

**प्रति,**

**गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद.**

**वित्तीय पत्रकांचा अहवाल**

1. आम्ही गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ यांच्या वित्तीय पत्रकांचे लेखा परिक्षण केलेले आहे. ज्यामध्ये दि. ३१ मार्च २०१९ च्या ताळेबंदाचे तसेच सोबत जोडलेल्या त्याच दिवशीसोबत असलेल्या वर्षाअखेरच्या प्रकल्प विकास खाते, महत्वाच्या लेखा तत्वांचा सारांश आणि स्पष्टीकरणात्मक माहिती यांचा समावेश आहे.

2. **वित्तीय पत्रके महामंडळाच्या व्यवस्थापनाची जबाबदारी**
वित्तीय पत्रके तयार करणे जे महामंडळाच्या आर्थिक स्थिती, आर्थिक कार्यप्रदर्शन याचे योग्य व वाजवी स्थिती दर्शविते ती सर्व साधारणपणे भारतात स्वीकारल्या गेलेल्या लेखा तत्वानुसार व इन्स्टिटयूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंटस् ऑफ इंडियाने निर्दिष्ट केलेल्या लेखा मानकाचा समावेश आहे. या जबाबदा-यांमध्ये महामंडळाच्या मालमत्तांचे रक्षण करणे तसेच लबाडी आणि इतर अनियमितता रोखण्यासाठी व कायद्याच्या तरतुदीनुसार पुरेसे लेखा अभिलेख्यांची देखभाल करणे देखील समाविष्ट आहे. योग्य लेखा धोरणांची निवड, वाजवी व विवेकपूर्ण निर्णय आणि अनुमान काढणे अणि अंतर्गत वित्तीय नियंत्रणाची आखणी, अंमलबजावणी आणि देखभाल, जे लेखा अभिलेख्यांची अचूकता आणि संपुर्णता सुनिश्चित करणेसाठी प्रभावीपणे कार्य करत होते, जे अर्थिक, नि:शुल्क दृष्टिकोन दर्शवितात आणि भौतिक गैरवर्तनापासून मुक्त असताता अशा वित्तिय विधानांची पूर्तता अणि सादरीकरणाशी संबंधित असतात.

**लेखा परिक्षकाची जबाबदारी**

3. या वित्तीय पत्रकांवर आमच्या लेखपरीक्षणाच्या आधारे मत व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे.

आम्ही कायद्याच्या तरतुदी, लेखा आणि लेखापरीक्षण मानके आणि अधिनियमाच्या तरतुदीनुसार लेखापरीक्षण अहवालात समाविष्ट करणे आवश्यक असलेल्य बाबींचा विचार केला आहे.

आम्ही आमचे लेखापरिक्षण हे इस्टिट्युट ऑफ चार्टड अकाऊंटट्स ऑफ इंडियाव्दारे जारी केलेल्या, लेखापरिक्षण मानकांप्रमाणे केलेले आहे. या मानकांनुसार आम्हाला नैतिक जबाबदारीचे पालन करणे, तसेच वित्तीय पत्रके महत्वांच्या चुकांपासून मुक्त आहेत याची वाजवी खात्री करण्याकरता लेखापरीक्षणाची आखणी करणे व पुर्णत्वास नेणे गरजेचे आहे.

लेखापरीक्षणामध्ये वित्तीय पत्रकांमध्ये असलेल्या संख्या व जाहीर माहिती संदर्भात पुरावे गोळा करण्यासाठी कार्यपध्दती सादर करणे याचा समावेश आहे. कार्यपध्दतीची निवड ही लेखापरीक्षकाच्या सुज्ञता ज्यामध्ये वित्तीय पत्रकांमधील चुक किंवा लबाडीमुळे झालेल्या महत्वाच्या चुकांच्या जोखमीचे मुल्यमापन याचा समावेश आहे. अशा जोखमीचे मुल्यमापन करताना लेखापरीक्षकाने महामंडळाच्या वित्तीय पत्रकाच्या तयारी व योग्य सादरीकरण संदर्भातील अंतर्गत नियंत्रण लक्षात घेतली आहेत. जेणेकरून परिस्थीतीला अनुरूप लेखापरीक्षण कार्यपध्दतीची आखणी करता येईल. लेखापरीक्षणामध्ये स्वीकारण्यात आलेल्या लेखातत्वांची योग्यता व व्यवस्थापनाने केलेल्या अंदाजाची रास्तता तसेच वित्तीय पत्रकाचे सर्वसाधारण सादरीकरण यांच्या मुल्यमापनाचा समावेश आहे.

आमच्या मते गोळा केलेले लेखापरीक्षण पुरावे हे पुरेसे आहेत व आमच्या अभिप्रायाला योग्य आधार आहेत.

RAKESH R. AGARWAL & ASSOCIATES M. No. 100223 MUMBAI CHARTERED ACCOUNTANTS

**अभिप्राय**

4. आम्हाला ज्ञात असलेल्या माहितीनुसार व मिळालेल्या स्पष्टीकरणास ही वित्तीय पत्रके सोबत जोडलेल्या पुरवणी अहवाल, विभाग व मंडळाचे सहामाही अहवाल. लेखापध्दतीत वापरलेली लेखातत्वे व त्यावरील सुचना यामध्ये नमुद केलेले शेरे व सुचनांच्या अधिन राहून योग्य व वाजवी माहिती दर्शवतात.

**अ)** ताळेबंदाच्या बाबतीत ३१.०३.२०१९ रोजी महामंडळाच्या घडामोडीची स्थिती.
**आ)** प्रकल्प विकास खात्याच्या बाबतीत ३१.०३.२०१९ रोजी संपणाऱ्या आर्थिक वर्षात.

राकेश आर. अग्रवाल **अँड असोसिएट्स करिता**
चार्टड अकाऊन्टटस

RAKESH R. AGARWAL & ASSOCIATES ★ CHARTERED ACCOUNTANTS ★ M. No. 100223 MUMBAI

**राकेश आर.अग्रवाल**
**प्रोप्रायटर**
**स.क्र..१००२२३**

**ठिकाण: मुंबई**
**दिनांक : २७-०१-२०२१**

## गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद

**लेखा पध्दतीत वापरलेली लेखा तत्वे व त्यावरील सूचना सन २०१८-१९.**
**महामंडळाची माहिती:**
महामंडळा ची स्थापना गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ अधिनियमांतर्गत महाराष्ट्र राज्यातील मराठवाडा विभागातील सिंचन सुविधांच्या विकासासाठी करण्यात आलेली आहे. महामंडळाचे सिंचन सुविधांची विकासकामे ही, महामंडळाच्या नोंदनिकृत कार्यालये, विभाग कार्यालये, मंडल कार्यालये, संयुक्त कार्यालये च्या मार्फत केला जातो.

**तक्ता :- १३**
**अ आवश्यक लेखा तत्वे :-**
**1) सर्वसाधरण**
1. महामंडळाने तापरलेली लेखातत्वे ही सातत्य राखणारी तसेच अशा प्रकारच्या लेख्यासाठी सर्वसाधारणपणे वापरात येणारी असल्यामुळे याचा विशेष उल्लेख करण्यात आला नाही.
2. महामंडळाची लेखे ही ऐतिहासीक किंमत या संकल्पनेवर आधारित आहेत. परंतु यामध्ये महाराष्ट्र शासनाकडून ०१।१०।१९९८ दिवशी व आतापर्यंत वर्ग करण्यात आलेल्या मालमत्ता व दायीत्व यांच्या किंमती समाविष्ट नाहीत कारण त्या व्यवस्थापनाने दिलेल्या किंमतीवर ठरवलेल्या आहेत.
3. ३१।०३।२०१९ चे ताळेबंद व त्याच दिवशी संपत असलेल्या वर्षाच्या अखेरचे प्रकल्प विकास खाते हे कंपनी कायदा २०१३ च्या परिशिष्ट ४ च्या नमुन्यात दाखवल्याप्रमाणे करण्यात आले आहे.
4. महामंडळाने वर्ष २००५-०६ पासून रोख लेखा पध्दत अवलंबिली आहे. त्यामुळे रोख तत्वावर मिळणा-या उत्पन्नाच्या आणि खर्चाच्या महत्त्वपूर्ण बाबी दिसुन येतात.
5. गो.म.पा.वि.म. कायदा व आयकर कायद्यानुसार प्रकल्प विकास खात्यातील तोटा हा चालू प्रकल्प कामांमध्ये भांडवल केला आहे.

**अ) स्थावर मालमत्ता - मूर्त**
1. ०१.१०.१९९८ रोजी व त्यापुढील वर्षात महाराष्ट्र शासनाकडून महामंडळाच्या वर्ग करण्यात आलेल्या स्थावर मालमत्तेची किंमत ही व्यवस्थापनाने दाखविलेली किंमत आहे.
2. स्थिर मालमत्ता किंमतीवर नमुद केली जाते. मालमत्तेची किंमतमध्ये त्याच्या खरेदी/बांधकाम खर्चाचा समावेश आहे. मालमत्ता इच्छित वापरासाठी कार्यरत स्थितीत आणण्यासाठी थेट गुणात्मक किंमतीचा समावेश आहे.

**ब) घसारा.**
या अहवालात महामंडळाच्या १९९८ च्या अधिनियमातील कलम ४४ मधील तरतुदीप्रमाणे स्थावर मालमत्तेवर घसाऱ्याची तरतूद केलेली आहे.

| अनु. | मालमत्ता | घसरा दर |
|---|---|---|
| १ | वाहन | १५% |
| २ | कार्यालयीन साहित्य | १०% |
| ३ | यंत्रसमुग्री | १०% |
| ४ | फर्निचर व फिक्चर | ०५% |
| ५ | इमारत (निवासी) | ०५% |
| ६ | इमारत (कार्यालयीन) | १०% |
| ७ | तातपुरते बांधकाम | १०% |

**क) चालू स्थितीतील प्रकल्प कामे.**
1. चालू स्थितीतील प्रकल्पावरील खर्चात त्या वर्षाच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष प्रशासकीय खर्चाच्या आस्थापना खर्च, वित्तीय खर्च, अग्रीम व इतर अशा त्या प्रकल्पावरील खर्चाचा समावेश आहे.
2. ०१।१०।१९९८ रोजीच्या प्रकल्पावरील चालू कामाची किंमत ही व्यवस्थापनाने दाखविलेली किंमत आहे.

RAKESH R. AGARWAL & ASSOCIATES M. No. 100223 MUMBAI CHARTERED ACCOUNTANTS

ड) **गुंतवणूक.**
गुंतवणूकीचे मुल्यांकन मुळ किंमतीनुसार केले आहे.

ई) **चल संपत्ती साठा.**

1 साठ्याचे मूल्यांकन हे महामंडळाच्या विभागांनी दिलेल्या लेख्याप्रमाणे घेतलेले आहे साठ्याच्या किंगतीत कालापरत्वे आणि प्रत्यक्ष साठ्यातील तुटवडा झालेल्या घसरणी करता तरतुद करण्यात आलेली नाही.

2 महामंडळाच्या खर्चाचा काही भाग वसूल करण्याकरता सिमेंट, लोखंड इ. साठा मुल्य अधिक पध्दतीने वितरीत करते. साठा निलंबन खात्यात असणारी शिल्लक ही साठ्याच्या किंमतीत कालपरत्वे जी घसरण झाली आहे. त्यासमोर समायेजित करण्यात आली आहे.

फ) **कर्मचारी लाभ योजना.**
या महामंडळातील सर्व कर्मचारी हे महाराष्ट्र शासनाकडून आलेले प्रति नियुक्तीवर बदली कर्मचारी असल्यामुळे महामंडळाच्या व्यवस्थापनाने मंजूर केलेले ग्रज्युटी दायित्व हे महाराष्ट्र शासनाची जबाबदारी आहे. त्यामुळे महामंडळाने लेखा मानक - १५ अनुसार निवृत्ती सहभाग याची तरतुद केलेली नाही.

ग) **चालू कर आणि स्थगित कर**

1. आयकर अधिनियम १९६१ च्या तरतुदीनुसार मोजण्यायोग्य करपात्र उत्पन्नाच्या संदर्भात देय ठरवलेली कर म्हणजे चालू कर.
2. स्थगित कर हा लेखा आणि करपात्र उत्पन्नामधील वेळेच्या फरकामुळे उद्भवलेला कर उत्तर दायित्वाच्या पध्दतीनुसार, सध्याच्या कराच्या दरावर, वेळेच्या फरकांमध्ये पारदर्शी फरक असणे अपेक्षित आहे.
3. महामंडळाकडे कोणतेही करपात्र उत्पन्न नाही. जसे की कर आकारणी व स्थगित करासाठी आवश्यक लेखा मानक -२२ नुसार अशी कोणतीही तरतूद केलेली नाही.

**संपत्ती कर :-** महामंडळाच्या मालकीची सर्व वाहने ही प्रकल्पनिहाय कामासाठी वापरलेली आहेत. आयकर विभागाने संपत्ती करासाठी वर्ष १९९९-०० ते २००१-०२ साठी सरासरी रू. १४.८० लक्षची मागणी केलेली आहे. महामंडळ हे सरकारच्या मालकिचे असून वाहने हि परिक्षणासाठी आहेत त्यामुळे त्यावर संपत्ती कर लागू होत नाही या मथळ्याखाली महामंडळाने हा वाद पुणे ट्रिब्युनल पुढे मांडला आहे. त्याचप्रमाणे आयकर विभागाने संपत्ती वर्ष २००२-०३ ते २००७-०८ साठी सरासरी रू.८.१३ लाखाची मागणी केलेली आहे. महामंडळाने हा वाद औरंगाबाद येथील संपत्ती कर विभागाच्या आयुक्त (याचिका) यांच्यासमोर मांडला आहे.

अ) **लेखा तत्वा वरील सुचना :-**

1) **महाराष्ट्र सरकार कडूनचे अनुदान.**

अ. चालू आर्थिक वर्षात महाराष्ट्र शासनाकडून रू.२१०६९.७१ कोटी (मागील वर्षी रू. १८५२५.२५ कोटी) भांडवली अनुदान मिळाले त्यात ०१।१०।१९९८ रोजी वर्गवार केलेल्या संपत्तीची किंमत समाविष्ट आहे.

ब. ३१ मार्च २०१९ वर्षाअखेरची जमा/खर्चाची तफावत रू.१.८२ कोटी (मागील वर्षी रू. ५९.६९ कोटी) चालू प्रकल्प कामाच्या भांडवली खर्चात टाकण्यात आलेली आहे.

2) **रोखे**
महामंडळाने सन २०१६-१७ दरम्यान सर्व शिल्लक रोख्यांची परतफेड केली आहे. जारी केलेले सर्व रोखे महामंडळाच्या काही मालमत्तां तारण ठेवून व महाराष्ट्र सरकारकडून नियूक्त केलेल्या खात्यात प्राप्त झालेल्या निधीवर प्रथम शुल्क आकारुन देण्यात आलेले आहे. तसेच देय व्याज आणि मुद्दल परतफेड या दोन्ही बाबतीत महाराष्ट्र सरकारव्दारे हमी दिली जाते.

3) खालील आकस्मिक दायित्वासाठी तरतूद करण्यात आलेली नाही. अपूर्ण प्रकल्प कामे, महामंडळावर केलेले विविध प्रकारचे दावे, आणि आर.टी.ओ. ज्यांचे दायित्व म्हणून निर्धारण करता येत नाही.

4) मंडळ विभागीय कार्यालयादरम्यान झालेल्या व्यवहारांची व त्याचा मेळ घालण्याचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही.

5) आंतर विभागीय शिल्लक निव्वळ रू.८२७.७७ कोटी डेबिट (मागील वर्षा अखेर रू. ५१३.१५ कोटी शिल्लक डेबिट ) ही मिळवणी न झालेल्या मंडळाच्या ऑपरेशन आणि कलेक्शन खात्यातील शिल्लक आहे त्या रक्कमाचे मंडळ व विभागीय कार्यालय यांचेमध्ये मेळ घालणे आहे आवश्यक आहे.

6) ताळेबंदात दाखवलेल्या विविध अचल संपत्ती उदा. जमीन, इमारत आणि प्रकल्प कामे यांचे मालकी हक्क अजूनपर्यंत जमीन हस्तांतरण कायद्याच्या तरतूदीप्रमाणे महामंडळाकडे वर्ग करण्यात आलेले नाहीत.

7) महामंडळाच्या चालू स्थितीतील प्रकल्प खात्यातील शिल्लक पूर्ण झालेली धरणे आणि योजना. चालू स्थितीतील प्रकल्प यामध्ये वर्गीकरण करणे गरजेचे आहे.

8) **घसारा.**

या अहवालात महामंडळाच्या १९९८ च्या अधिनियमातील कलम ४४ मधील तरतुदीप्रमाणे स्थावर मालमत्तेवर घसाऱ्याची तरतूद केलेली आहे.

| अनु. | मालमत्ता | घसरा दर |
|---|---|---|
| १ | वाहन | १५% |
| २ | कार्यालयीन साहित्य | १०% |
| ३ | यंत्रसमुग्री | १०% |
| ४ | फर्निचर व फिक्श्चर | ०५% |
| ५ | इमारत (निवासी) | ०५% |
| ६ | इमारत (कार्यालयीन) | १०% |
| ७ | तात्पुरते बांधकाम | १०% |

9) महामंडळ धरणाचे बांधकाम सामाजिक बांधिलकीतून करत असून त्यात कोणताही व्यावसायिक हेतू नाही त्यामुळे कॅशफ्लो (लेखा संहिता -३) करणे गरजेचे नाही.

10) मागील वर्षातील रकमा आकडे आवश्यकतेनुसार सुसंघटीतरीत्या त्या त्या खात्यात पुन: वर्ग करण्यात आल्या आहेत.

11) देणे येणी व अग्रीम यातील शिल्लक महामंडळाने मान्य केली आहेत.

**राकेश आर. अग्रवाल अँड असोसिएट्स करिता**
**चार्टड अकाऊन्टटस**

राकेश आर.अग्रवाल
प्रोप्रायटर
स.क्र.१००२२३

RAKESH R. AGARWAL & ASSOCIATES * CHARTERED ACCOUNTANTS * M. No. 100223 MUMBAI

मुख्य लेखा व वित्त अधिकारी
गो.म.पा.वि.म. औरंगाबाद

कार्यकारी संचालक
गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद

ठिकाण: मुंबई
दिनांक : २७-०१-२०२१